# शिवाजीनगर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा ४ तासात केला उघड

देशोन्नती दि 08/07/2023

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ दुचाकीस्वारास अडवून खंजरचा धाक दाखवून व काठीने मारहाण करुन मोबाईल व नगदी रक्कम जबरीने चोरुन नेणाऱ्या तिघांना घटनेच्या अवघ्या ४ तासात शिवाजीनगर ठाण्याच्या डीबी पथकाने ताब्यात घेऊन त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला.

अंकुर हॉस्पीटल समोरील मार्गावर ५ जुलै रोजी २ महिला व १ इसमाने दुचाकीस्वारास थांबवुन मोबाईल कॉल करु द्या, असे म्हणुन मोटार सायकल थांबवुन त्यास काठीने मारहाण केली व खंजरचा धाक दाखवुन त्याच्या खिशातुन मोबाईल व नगदी १५ हजार ७० रुपये असा एकुण २७ हजार ७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदरच्या गंभीर स्वरुपाच्या घटनेतील आरोपींचा तात्काळ शोध घेण्याचे वरिष्ठांनी आदेश दिले. त्यानुसार डीबी पथकाने आरोपींचा शोध घेवुन आरोपी सचिन खिल्लारे (२२) रा. कौठा नांदेड, माया माथेकर (३५) रा. मालेगांव ता. अर्धापुर ह.मु. दत्तनगर रेल्वेपटरी जवळ नांदेड, सोनी नरवाडे (३२) रा. पिरबुऱ्हाणनगर यांना तात्काळ ताब्यात घेवुन त्यांच्याकडून गुन्ह्यातील मोबाईल व गुन्ह्यात वापरलेला खंजर असा मुद्देमाल जप्त केला.

या पथकात पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव, पोलीस निरीक्षक मोहन भोसले, सपोनि उमाकांत पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक प्रमुख पोउपनि मिलींद सोनकांबळे, अंमलदार दिलीप राठोड, शेख इब्राहीम, देवसिंग सिंगल, शेख अझहर, दत्ता वडजे, विष्णु डफडे यांचा समावेश होता.